# प्राथमिक शिक्षणाचा मूलभूत हक्क

व्यक्तीचे वाढदिवस विशेषतः २५ वा, ५० वा, ७५ वा साजरे होताना आपल्याला जसे दिसतात तसेच संस्थांच्या वाटचालीचे महत्त्वाचे टप्पे सांगणारी वर्षेही समारंभपूर्वक 'साजिरी' होतात. संस्थेची मूळ ध्येय-धोरणे, वेगवेगळ्या व्यक्तींनी त्या संस्थेच्या उभारणीत दिलेले योगदान, प्रारंभीच्या काळात अडचणींवर प्रयत्नपूर्वक केलेली मात, ध्येयधोरणांशी सुसंगत असे केले गेलेले विशेष उपक्रम व संस्थेची वर्तमान स्थिती यांचा आढावा समाजापुढे मांडण्याची संधी म्हणून असे समारंभ महत्त्वाचे असतात. भारताचा स्वातंत्र्य सुवर्णमहोत्सव या दृष्टीनेच जसा साजरा झाला तसाच तो 'साजिरा' करण्याचेही प्रयत्न झाले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर २६ नोव्हेंबर १९५० रोजी स्वतंत्र भारताने स्वतःची राज्यघटना अंगीकृत केली आणि एक 'प्रजासत्ताक' राष्ट्र म्हणून इतिहासात भारताची नोंद झाली. २६ जानेवारी १९५० हा दिवस 'प्रजासत्ताकदिन' म्हणून आपण साजरा करू लागलो. म्हणूनच या वर्षीच्या प्रजासत्ताक दिनाला प्रजेची सत्ता कितपत अंमलात आली आणि राज्यघटनेतील निदेशक तत्त्वांची व मूलभूत हक्कांची अंमलबजावणी कितपत झाली याबद्दल विचार करणे उचित ठरेल.

प्रस्तुत लेखात आपण 'प्राथमिक शिक्षणाचा मूलभूत हक्क' याबद्दल जो विचार करणार आहोत तो राज्यघटनेतील प्रास्ताविका, त्या घटनेतील तिसऱ्या भागात नोंदलेले मूलभूत हक्क व चौथ्या भागात नोंदलेली निदेशक तत्त्वे - विशेषतः घटनेतील ४५ वे कलम - यांच्याशी निगडित आहे. म्हणून आपण प्रथमतः भारताच्या संविधानाची प्रास्ताविका वाचूया.

> 'आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस : सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय, विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य, दर्जाची व संधीची समानता, निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधुता प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून, आमच्या संविधानसभेत आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर १९४९ रोजी याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वतःप्रत अर्पण करीत आहोत.'

या प्रास्ताविकेत समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाहीचा जसा उल्लेख आहे तशीच त्यात न्याय व

समानता यांचीही नोंद आहे. या संकल्पना साकार करण्याचे अतिशय महत्त्वाचे साधन म्हणजे शिक्षण. यासंदर्भात राज्य घटनेचे ४५ वे कलम महत्त्वाचे आहे ते कलम असे आहे-

**'बालकांकरिता मोफत व सक्तीच्या शिक्षणाची तरतूद'**

'राज्य हे या संविधानाच्या प्रारंभापासून १० वर्षाच्या कालावधीच्या आत सर्व बालकांना त्यांच्या वयास १४ वर्षे पूर्ण होईपर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची तरतूद करण्यासाठी प्रयत्नशील राहील.'

घटनेतील हा भाग 'राज्यधोरणाची निदेशक तत्त्वे' यात समाविष्ट असल्याने कोणते प्रयत्न करावेत हे यात सांगितले आहे. राज्यघटनेच्या चौथ्या भागात धोरणविषयक निदेशक तत्त्वे मांडलेली आहेत. तर तिसऱ्या भागात मूलभूत अधिकारांची मांडणी आहे. मूलभूत अधिकारांचा भंग झाल्यास त्याविरुद्ध न्यायालयात दाद मागता येते. निदेशक तत्त्वांचा भंग झाल्यास तसे करता येत नाही. निदेशक तत्त्वे ही केवळ तत्त्वेच राहणार असतील, तर त्यांचा समावेश राज्य घटनेमध्ये करण्याचे प्रयोजनच काय असे विचारले गेले असता डॉ. आंबेडकरांनी निवेदन केले होते की, जरी निदेशक तत्त्वांची अंमलबजावणी ही न्यायालयातून करून घेणे शक्य नसले तरी कोणतेही सरकार या निदेशक तत्त्वांची अंमलबजावणी किती व कशी करते हे जनतेने पहावे व त्यानुसार जनता सरकारला, राजकीय पक्षांना, नेत्यांना एखाद्या सरकारच्या बाजूने किंवा विरुद्ध कौल देईल आणि तो अंकुश सरकारवर राहील. निदेशक तत्त्वे यांचा असा अंकुश म्हणून वापर व्हावा ही संसदकारांची अपेक्षा होती. तेव्हा प्राथमिक शिक्षणाचा हक्क १० वर्षात जर आपल्या सरकारने दिला नाही तर त्याबाबत नागरिकांनी निवडणुकांमध्ये या कारणाकरिता सरकारला जाब विचारणे भाग होते. ते आपण केले नाही म्हणजे पर्यायाने आपणच याला जबाबदार आहोत. स्वातंत्र्योत्तर कालात शिक्षणाचा प्रसार झाला. विद्यापीठांच्या व महाविद्यालयांच्या संख्येत वाढ झाली, माध्यमिक शाळांची संख्याही तुलनेने बरीच वाढली. परंतु वय वर्षे ६ ते १४ या गटातील शिक्षणाकडे म्हणजेच प्राथमिक शिक्षणाकडे अक्षम्य दुर्लक्ष झाले. परिणामतः आजही निरक्षरतेच्या बाबतीत जगात भारताचा तिसरा क्रमांक आहे ! प्राथमिक शिक्षणाकडे झालेले अक्षम्य दुर्लक्ष दूर करण्यासाठी ८३ वी घटना दुरुस्ती मांडली गेली. त्या दुरुस्तीची मसुदाही आपण वाचू.

**घटनेतील कलम २१ नंतर पुढील कलमाचा समावेश करण्यात यावा.**

२१ अ) १. वय वर्षे सहा ते चौदा पर्यंतच्या सर्व नागरिकांना शासन मोफत आणि सक्तीचे शिक्षण देईल.

२. मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाच्या हक्कावरील कलम (१) मध्ये नमूद केल्याप्रमाणेची अंमलबजावणी शासन कायद्यानुसार जसे ठरवतील तशी होईल.

३. गैरसरकारी शिक्षण संस्थांना किंवा ज्या शिक्षण संस्थांना सरकारी मदत मिळत नाही अशा संस्थांच्या संदर्भात कलम (२) अंतर्गत शासन सक्तीच्या आणि मोफत शिक्षणाचा कायदा करणार नाही.

४. घटनेतील ४५ वे कलम वगळावे.

ही घटना दुरुस्ती अंमलात येण्यात राजकीय इच्छाशक्ती, जनमानसाची त्याबाबत तळमळ जशी अंतर्भूत आहे तशीच ते करण्याबाबतच्या आर्थिक शक्याशक्यतेचा प्रश्नही समाविष्ट आहे.

सदरची घटना दुरुस्ती आता मांडली गेली असली तरी वास्तविक पाहता भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वीच मूलभूत हक्कातील कलम २१ म्हणजेच 'जीविताचा अधिकार' व निदेशक तत्त्वातील कलम ४५ याचा एकत्रित अर्थ लावून 'जीविताचा अधिकार' म्हणजे कवळ जगण्याचा अधिकार नसून चांगले जगण्याचा अधिकार व त्यासाठी आवश्यक त्या सर्व बाबी म्हणजेच शिक्षण, पर्यावरण आदी त्यामध्ये अंतर्भूत असलेचे महत्त्वपूर्ण निर्णय दिलेले आहेत. कु. मोहिनी जैन विरुद्ध स्टेट ऑफ कर्नाटक या कामात १९९२ साली सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश कुलदीप सिंग यांनी असे म्हटले आहे की, ``Without making right to education underArticle 45 of the Constitution a reality the fundamental rights under Chapter 3 shall remain beyond the reach of large majority which is illiterate." म्हणजेच जोपर्यंत कलम ४५ प्रमाणे सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण आपण निर्माण करू शकत नाही तोपर्यंत आपले मूलभूत हक्क हे भारताच्या सर्वसामान्य अशिक्षित जनतेपासून सदैव दूरच राहतील. इ. सन १९९३ मध्ये उन्नीकृष्णन विरुद्ध स्टेट ऑफ आंध्र प्रदेश ह्या गाजलेल्या खटल्यात न्यायमूर्ती पी. जीवनरेड्डी यांनी मेडिकल व इंजिनिअरिंग प्रवेशाबाबतचा आपला निर्णय देताना त्यात भारतीय नागरिकांना प्राथमिक शिक्षणाचा अधिकार असल्याचेही प्रतिपादन केले होते.

नंतर गुणवत्तेचा प्रश्न हातात घेऊया असे म्हणणे म्हणूनच धोक्याचे ठरेल. सारी परिस्थिती अनुकूल होण्याची वाट आपण पहात बसलो तर...? यासंदर्भात एका गोष्टीतील दोन बियांचा संवाद आपण वाचूया. भारताला त्या बियांपैकी पहिली बी होणे आवडेल की दुसरी हा विचार आपणच करायचा. ती गोष्ट वाचूया.

'सुपीक जमिनीच्या पोटात वसंत समयी दोन बिया पहुडल्या होत्या.

पहिले बी म्हणाले, ''मला मोठं व्हायचंय ! मला माझी मुळं जमिनीत खोलवर वाढवायची आहेत.. मला माझ्या कोवळ्या कळ्या पताकांसारख्या फडकवायच्या आहेत. जगाला वसंताच्या आगमनाची वार्ता द्यायची आहे. मला सूर्याची उष्णता अनुभवायची आहे आणि माझ्या पाकळ्यांवर सकाळच्या दंवाच्या थेंबांचा आशीर्वाद घ्यायचा आहे.''

दुसरे बी म्हणाले, ''मला भीती वाटते. मी जर माझी मुळे खाली जमिनीत वाढवली तर अंधारात काय काय होईल कोण जाणे ! माझ्या नाजूक अंकुरांना जर मी जमिनीच्या कठीण कवचातून वर ढकलले तर त्यांचे नुकसान होईल... माझ्या कळ्या गोगलगायींनी खाऊन टाकल्या तर? आणि माझे चांगले फुललेले रोप एखाद्या द्वाड मुलाने जमिनीतून उखडून काढले तर? सर्व काही सुरक्षित आहे असे कळेपर्यंत मी वाट पाहीन.'' आणि म्हणून ते वाट पहात राहिले. सकाळी खाणे शोधण्यासाठी जमीन उकरत फिरणाऱ्या कोंबडीला ते वाट पाहणारे बी सापडले व तिने ते खाऊन टाकले.'

भारताने गुणवत्तापूर्ण प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारासंदर्भात कोणत्या बीचे उदाहरण लक्षात ठेवायचे हे ठरविण्याचा अधिकार लोकशाही भारतातील प्रत्येक नागरिकास असल्याने प्राथमिक शिक्षणाबाबत आवश्यक ती लोकचळवळ उभी राहण्याची आशा बाळगूया.

---

**ॲड. (डॉ.) संतोष शहा**

भारतात व परदेशात शिक्षण घेत असता बुद्धिमान व अभ्यासू विद्यार्थी म्हणून लौकिक व त्यामुळे त्याकाळात अनेक शिष्यवृत्त्या व पुरस्कार. सध्या ॲडव्होकेट म्हणून प्रसिद्ध. शिवाजी विद्यापीठ व महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ यांचे विधिविषयक सल्लागार. त्याशिवाय कोल्हापूर जिल्ह्यातील अनेक औद्योगिक, सामाजिक व शैक्षणिक संस्थांचे विधिविषयक सल्लागार. कोल्हापुरातील शहाजी लॉ कॉलेजमध्ये अधिव्याख्याता. शिवाय पुणे, सांगली, कोल्हापूर येथील काही शैक्षणिक संस्थांतील व्हिजिटिंग प्रोफेसर. स्वतःचा व्यवसाय सांभाळीत सामाजिक व शैक्षणिक कामांत सहभाग. सृजन - आनंद शिक्षण केंद्राचे सदस्य व कार्यकर्ते.

---